1 नियमीत दिवाणी दावा क्र. ७/२०२१.
रामकृष्ण वि. महाराष्ट्र शासन.

## निशाणी क्र. ४१ खालील आदेश

सदर अर्ज हा प्रतिवादी क्र. २ द्वारे त्यांच्याविरुद्ध झालेला विना म्हणणे, कैफीयत आदेश बाजुला सारण्यासाठीचा आहे.

०२. अर्जदारांचे म्हणणे आहे की, कोरोनाच्या कालावधीमध्ये त्याला कैफीयत व म्हणणे दाखल करण्यास कसूल झाला. तरी अर्ज मंजूर करावा.

०३. प्रतिपक्षाने उत्तर दिले आहे की, सदर अर्ज देण्यास ९ महिन्यांचा उशीर झाला किंवा मंजूर करावायचे झाल्यास रक्कम रुपये ५००/– दंड लावावा.

०४. सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. २ ही दिनांक २०.०२.२०२१ रोजी हजर झाले. त्यांना निशाणी क्र. १३ प्रमाणे समन्सची बजावणी दिनांक २०.०१.२०२१ रोजी झाली होती. सदर कालावधीमध्ये न्यायालयीन कामकाज सुरु होते व दिनांक २०.०१.२०२१ ते २०.०२.२०२१ पर्यंत जवळपास एक महिन्याच्या कालावधी उपलब्ध होता. तरी कोरोना असल्याबाबतचे कथन योग्य नाही. आज रोजी सदर अर्जदार/प्रतिवादी किंवा त्याचे विधीज्ञ वेळोवेळी पुकारा करुन गैरहजर. तरी परंतू प्रकरण गुणांगुणावर निकाल होण्याकामी अर्ज मंजूर करणे, योग्य होईल. करिता, आदेशः–

### आ दे श

अर्ज रक्कम रुपये ५००/– वादीस देण्याच्या अटीवर मंजूर.

०२. रक्कम रुपये ५००/– देण्यास कसूर केल्यास सदर अर्ज हा अस्तित्वात असणार नाही. त्याचा उपयोग अर्जदारास होणार नाही.

(तेजवंत सिंघ अ. संधू)
दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर,
बार्शी.

दिनांक :– ०७.१०.२०२१.

## **CERTIFICATE**

I affirm that contents of this PDF file Order /Judgment are word to word same, as per the original Order /Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shripad N. Chilka |
| Name of the Court | : Civil Judge Sr. Division, Barshi. |
| Judgment / order signed by the Presiding Officer on | : 07.10.2021 |
| Judgment / Order uploaded on | : 08.10.2021 |